सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शैक्षणिक दिनदर्शिका

## (इयत्ता आठवी)

## जून ते ऑगस्ट २०२०




राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

# प्रेरणा व मार्गदर्शन



मा.ना.उद्धवजी ठाकरे
मुख्यमंत्री
महाराष्ट्रराज्य



मा.ना.अजित पवार
उपमुख्यमंत्री
महाराष्ट्रराज्य



प्रा.वर्षा गायकवाड
मंत्री
शालेय शिक्षण विभाग
महाराष्ट्र राज्य



मा.ओमप्रकाश उर्फ बच्चू बाबाराव कडू
राज्य मंत्री
शालेय शिक्षण विभाग
महाराष्ट्र राज्य



मा.वंदना कृष्णा(भा.प्र.से.)
अपर मुख्य सचिव
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
महाराष्ट्र राज्य



मा.विशाल सोळंकी(भा.प्र.से.)
आयुक्त (शिक्षण)
महाराष्ट्र राज्य



# शुभेच्छा संदेश...

जीवनातील विविध समस्यांना सामोरे जाताना शिक्षणाची ज्योत तेवत ठेवणाऱ्या असंख्य बालकांसमोर कोविड-१९ मुळे एक नवीन आव्हान उभे राहिले आहे. सर्व पालक, शिक्षक, शिक्षणप्रेमी यांच्यापुढे भविष्यातील शिक्षणाच्या व्यवस्थेबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत. पण पुरोगामी महाराष्ट्र या अडचणीतूनही मार्ग काढून विद्यार्थी व शिक्षक यांच्या आरोग्याला प्राधान्य देऊन विद्यार्थ्यांचे शिक्षण होत राहील यासाठी प्रयत्न करत राहील आणि शिक्षणातही मागे राहणार नाही याची मला खात्री आहे.

आरोग्याला प्राधान्य देऊन शिक्षण चालू ठेवता येईल काय यावर शासन पातळीवर बरीच चर्चा होऊन शाळा बंद असल्या तरी मुलांच्या शिकण्याची प्रक्रिया कायम ठेवण्यासाठी शालेय शिक्षण विभाग 'शैक्षणिक दिनदर्शिका' घेऊन येत आहे. शिक्षण विभागाच्या या प्रयत्नांना सर्व शिक्षक, विद्यार्थी,शाळा व्यवस्थापन समिती व पालकांनी सकारात्मक प्रतिसाद द्यावा असे आवाहन मी या निमित्ताने करते.

सर्वांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा!

**प्रा.वर्षा गायकवाड**
**मंत्री**
**शालेय शिक्षण विभाग**
**महाराष्ट्र राज्य**



# मनोगत

**महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!**

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे मागील काही दिवसांपासून आपण अनेक संकटांचा सामना करत आहोत. आरोग्य आणि दैनंदिन उदरनिर्वाहाचा प्रश्न असणाऱ्या असंख्य बालकांना परिस्थितीमुळे शिक्षण सोडण्याची वेळ येऊ नये तसेच शिक्षणाशी, शिक्षकांशी त्यांचा संबंध तुटू नये यासाठी मागील २ महिन्यांपासून आम्ही 'शाळा बंद, पण शिक्षण आहे...' ही अभ्यासमाला सुरु ठेवली होती आणि त्याला महाराष्ट्रभरातून प्रचंड प्रतिसाद मिळाला. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये १५ जूनपासून सर्व महाराष्ट्रात प्रत्यक्ष शाळा सुरु करण्यात अनेक अडचणी आहेत. त्यामुळे आपण डिजिटल माध्यमातून शिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने शैक्षणिक दिनदर्शिकेची निर्मिती केली आहे. या शैक्षणिक दिनदर्शिकेचा वापर शिक्षक, पालक यांनी अत्यंत विचारपूर्वक करून विद्यार्थ्यांचे शिकणे अधिक समृद्धकरणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष शाळा सुरु होत नाहीत तोपर्यंत विद्यार्थी शैक्षणिक दिनदर्शिकेचा वापर करून आपल्या सवडीनुसार आणि वेळेनुसार शिक्षण घेऊ शकणार आहेत. यामध्ये अध्ययन पूरक साहित्य, कृती, स्वाध्याय यांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. आम्ही दीक्षा, रेडिओ, टेलिव्हिजन, अध्ययन व्यवस्थापन प्रणाली (LMS) इत्यादी माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्नशील असून त्याचाच एक भाग म्हणून शैक्षणिक दिनदर्शिका तयार करण्यात आली आहे. या उपक्रमास शिक्षक, पालक व विद्यार्थी सकारात्मक प्रतिसाद देतील आणि शिक्षणाची प्रक्रिया सुरु ठेवतील अशी मला आशा आहे.

शैक्षणिक दिनदर्शिकेचा प्रमुख उद्देश हा या संकटाच्या कालावधीमध्ये देखील विद्यार्थी शिक्षणप्रवाहात रहावा हाच आहे. आरोग्यासोबतच विद्यार्थ्यांचे शिक्षण हे ही महत्वाचे आहे. यासाठीच घरी बसून देखील विद्यार्थी शैक्षणिक दिनदर्शिकेचा वापर करून त्याच्या वेळेनुसार शिकू शकणार आहे. शाळा बंदच्या कालावधीमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभीच्या अनुषंगिक कृती तसेच अध्ययन अनुभव पूर्णतः देणे शक्य होणार नाही पण काही अध्ययन अनुभव हे या उपलब्ध ई-साहित्याच्या माध्यमातून देणे नक्कीच शक्य होणार आहे.

**दिनकर पाटील**
**संचालक**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण**
**परिषद, महाराष्ट्र, पुणे**

# शैक्षणिक दिनदर्शिका

नमस्कार विद्यार्थी मित्रहो,

सध्या कोविड-१९ या रोगामुळे संपूर्ण जग विविध समस्यांना सामोरे जात आहे. त्याला शिक्षणक्षेत्रही अपवाद नाही. जगभरातील शाळा-महाविद्यालये अनिश्चित काळासाठी बंद आहेत. शिक्षक, विद्यार्थी, पालक हे सर्वजण शाळा कधी सुरु होणार याविचारात आहेत. शाळा सुरु करता येत नसल्या तरी शिकणे जास्तीत जास्त समृद्ध करता येऊ शकेल का याचा विचार शासनपातळीवरही होत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी दीक्षा ऍप, रेडिओ, टेलिव्हिजन,अध्ययन व्यवस्थापन प्रणाली (LMS) यांचा वापर करण्यासाठी सुद्धा शासन प्रयत्नशील आहे. त्याचाच एक भाग म्हणून दीक्षा ऍप्लिकेशनचा वापर मुलांच्या अध्ययनासाठी करण्याचा एक छोटासा प्रयत्न शैक्षणिक दिनदर्शिकेच्या रुपात आम्ही करत आहोत. शैक्षणिक दिनदर्शिका स्मार्ट पीडीएफ रुपात असून यामध्ये दिलेल्या अध्ययन स्त्रोतांवर स्पर्श केल्यास संबंधित ई-साहित्य आपल्यासमोर व्हिडिओरुपामध्ये दिसेल. शैक्षणिक दिनदर्शिका पाहताना इंटरनेट कनेक्टिव्हिटीची समस्या जाणवत असल्यास रेंज आहे अशा ठिकाणी जाऊन संबंधित ई-साहित्य दीक्षा ऍप्लीकेशनवरुन आपण डाऊनलोड करु शकतो व इंटरनेट कनेक्टिव्हिटी नसलेल्या ठिकाणी ऑफलाईन वापरु शकतो.

महाराष्ट्र राज्यातील सर्वच विद्यार्थी व पालक सहजपणे वापर करु शकतील असा जून, जुलै व ऑगस्ट २०२० या महिन्यांसाठीचा अध्ययन साहित्यस्त्रोतांचा संच शैक्षणिक दिनदर्शिकेच्या रुपामध्ये आपणा सर्वांसाठी उपलब्ध करून देत आहोत. प्राप्त परिस्थितीत उपलब्ध अध्ययन स्त्रोतांच्या मदतीने तयार केलेल्या शैक्षणिक दिनदर्शिकेस शिक्षक, पालक व विद्यार्थी सकारात्मक प्रतिसाद देतील असा विश्वास वाटतो. शैक्षणिक दिनदर्शिकेचा उपयोग आपल्या पाल्याचे किंवा आपल्या विद्यार्थ्यांचे अध्ययन सुकर करण्यासाठी नक्कीच होईल अशी आशा आहे.

शैक्षणिक दिनदर्शिका विद्यार्थ्यांनी पालक आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली वापरावयाची आहे.तसेच शिक्षकांनी फोन कॉल, व्हाट्सअप या माध्यमातून विद्यार्थी आणि पालक यांच्या संपर्कात राहून शैक्षणिक दिनदर्शिकेच्या साह्याने मुलांचे शिक्षण आनंददायी कसे होईल यासाठी प्रयत्न करावयाचा आहे. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक दिनदर्शिकेचा वापर करत असताना पालक आणि घरातील इतर वडीलधारी मंडळी तसेच मोठे बहीण-भाऊ यांच्या देखरेखीखाली अध्ययन साहित्य वापरावे. शैक्षणिक दिनदर्शिकेमध्ये अध्ययनस्त्रोत म्हणून दीक्षा ॲप वरील संबंधित घटकांचे ई साहित्य दिले आहे. या साहित्याचा वापर संदर्भ म्हणून करण्यापूर्वी शिक्षकांशी चर्चा करणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे शिक्षकांच्या सूचनेनुसार पाठ्यपुस्तकांचाही वापर आवश्यक आहे.

केवळ शैक्षणिक दिनदर्शिका पुरवल्याने विद्यार्थ्यांचा अभ्यास पूर्ण होणार नसून शिक्षकांनी सतत पालक व विद्यार्थ्यांच्या संपर्कात राहणे त्यांच्याशी चर्चा करणे, त्यांना काही प्रश्न विचारणे या माध्यमातून विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करावे. विद्यार्थ्यांवर सतत ऑनलाईन चाचण्यांचा मारा करणे योग्य नाही. त्याचप्रमाणे लेखी गृहपाठ, स्वाध्याय आणि चाचण्यायामुळे विद्यार्थ्यांचे अध्ययन कंटाळवाणे होणार नाही याचीही दक्षता शिक्षकांनी घेणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे विद्यार्थीनिहाय या नियोजनामध्ये लवचिकता सुद्धा असावी.

## शिक्षकांसाठी सूचना :

1. शैक्षणिक दिनदर्शिका सर्व शिक्षकांनी आपल्या सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवावी.
2. शैक्षणिक दिनदर्शिका विद्यार्थ्यांनी वापरायला सुरु करण्यापूर्वी शिक्षकांनी सर्व वापरकर्त्या विद्यार्थ्यांशी व पालकांशी फोन, व्हिडीओ कॉल, ग्रुप कॉल,कॉन्फरन्स कॉल करून संवाद साधावा आणि शैक्षणिक दिनदर्शिका वापरून अभ्यास कसा करावा याबद्दल मार्गदर्शन करावे.
3. वर्गशिक्षकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना फक्त अभ्यासबद्दल बोलू नये. हा संवाद अनौपचारिक असावा. विद्यार्थी, कुटुंब, सध्याची दिनचर्या व घरात सध्या स्वीकारलेली जबाबदारी, आजूबाजूच्या परिस्थितीबाबत त्याचे मत याबद्दल चर्चा करून शिक्षक - विद्यार्थी संबंध दृढ होतील याची काळजी घ्यावी.

4. वर्गशिक्षकांनी, विषयशिक्षकांनी पाठ शिकताना पुस्तकाचा कसा वापर कसा करावा याबद्द्ल सूचना द्याव्यात.
5. प्रत्येक पाठाचे ई-साहित्य बघण्यापूर्वी व बघितल्यानंतर काय करावे याबद्दलही विद्यार्थ्यांना सांगावे.
6. त्याचप्रमाणे पाठातील ई-साहित्याशी संबंधित समांतर उपक्रम आणि स्वाध्याय ह्याबाबतीत विद्यार्थ्यांशी संवाद साधावा.
7. नियमित अभ्यासाला पर्याय म्हणून आपण दीक्षा ऍपचा वापर आपण करत नाही आहोत तर शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील आंतरक्रियेतून जे विद्यार्थ्यांचे अध्ययन घडते त्याला पूरक साहित्य किंवा शैक्षणिक साहित्य म्हणून ई -साहित्याचा वापर करणे अपेक्षित आहे.
8. शैक्षणिक दिनदर्शिकेमध्ये देण्यात आलेल्या कृतीशिवाय शिक्षकांनी आपल्या स्तरावर इतर आवश्यक कृती व उपक्रम विद्यार्थ्यांना पुरविण्यास हरकत नाही.

**शैक्षणिक दिनदर्शिका वापरण्यासाठी विद्यार्थी व पालक यांच्याकरिता  महत्वाच्या सूचना :**

1. शैक्षणिक दिनदर्शिका म्हणजे पाठ्यपुस्तकातील पाठांवर आधारित नियोजन असून त्याचा उद्देश विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभ करणे हा आहे.
2. शैक्षणिक दिनदर्शिकेनुसार अध्ययन करताना यावर्षी आपल्याला पुरवलेल्या नवीन पाठ्यपुस्तकांचा उपयोग करावा.
3. दीक्षाऍप पाहण्यापूर्वी एकदा पाठ्यपुस्तकातून संबंधित पाठ वाचावा. त्याचप्रमाणे ई-साहित्य पाहिल्यानंतरही ई-साहित्यातील अध्ययन घटक पुन्हा वाचणे अधिक फायदेशीर ठरेल.
4. पाहिलेल्या आणि वाचलेल्या अध्ययन घटकांत काही समस्या असल्यास ती आपले पालक, घरातील ज्येष्ठ व्यक्ती, मोठे बहीण-भाऊ शिक्षक यांच्याशी चर्चा करावी.
5. एक पाठ अभ्यासून संपल्यानंतर त्यावरील स्वाध्याय पूर्ण करावा व शक्य झाल्यास तो घरातील ज्येष्ठांकडून तपासून घ्यावा.
6. दररोज प्रत्येक विषयाचा अभ्यास करण्याची सवय लावून घ्या.
7. ठराविक कालावधीनंतर शिक्षकांनी पाठवलेल्या चाचण्याही सोडवा.
8. ई-साहित्य वापरताना घरातील ज्येष्ठ व्यक्तींच्या सानिध्यातच रहा.
9. ई-साहित्य सलगपणे न पाहता प्रत्येक विषय संपल्यानंतर थोडी विश्रांती घ्या. मोबाईल किंवा इलेक्ट्रॉनिक गॅजेट काही वेळासाठी दूर ठेवा.
10. इ.१ ली व २ रीच्या विद्यार्थ्यांनी दीक्षा ऍप व पाठ्यपुस्तक घरातील वडीलधाऱ्या मंडळींच्याच मदतीने वापरायचे आहे.
11. आवश्यक तेथे सांगितलेल्या कृती, प्रयोग किंवा उपक्रम करण्यापूर्वी वडीलधाऱ्या मंडळींना त्याची कल्पना द्या अथवा त्या कृती किंवा उपक्रम त्यांच्या मदतीनेच करा.
12. शैक्षणिक दिनदर्शिकेमधील लिंक open होत नसल्यास सदर घटकाशी संबंधित ई-साहित्य DIKSHA APP च्या माध्यमातून आपणास पाहता येईल. यासाठी DIKSHA APP आपल्या मोबाईल मध्ये DOWNLOAD करून घ्यावे. तसेच पाठ्यपुस्तकामध्ये देण्यात आलेल्या QR CODE DIKSHA APP मधून SCAN करून ही पाहता येईल.

**DIKSHA APP DOWNLOAD करण्यासाठी** येथे क्लिक करा

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

# शैक्षणिक दिनदर्शिका

## (इयत्ता आठवी)

## माहे – जून, जुलै, ऑगस्ट २०२०

# इयत्ता – आठवी

माहे – जून २०२०   विषय – मराठी

| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| पहिला आठवडा | 08-01-08<br>08-01-12 | 1. भारत देश महान | येथे क्लिक करा | प्रस्तुत गीत विद्यार्थी तालासुरात म्हणतील व याबाबतच्या समूह गीतांच्या ध्वनिफिती ऐकतील |
| दुसरा आठवडा | 08-01-04<br>08-01-09<br>08-01-12<br>08-01-14<br>08-01-15 | 2. माझ्या देशावर माझे प्रेम आहे | येथे क्लिक करा | मजकुराचे वाचन करा संवाद सादरीकरण करा.<br>खालील विषयावर बोला मी केलेला संकल्प..<br>शाळेसंबंधी विद्यार्थ्यांची कर्तव्य कोणती या विषयी चर्चा करा..<br>आपल्या कार्यातून देशावर आणि देशातील लोकांवर प्रेम करणाऱ्या परिसरातील व्यक्तींची माहिती मिळवा व ती माहिती लिहून काढा.. |

माहे – जुलै २०२०   विषय – मराठी

| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| पहिला आठवडा | 08-01-01<br>08-01-05<br>08-01-06<br>08-01-12<br>08-01-15 | ५. सुरांची जादुगिरी | येथे क्लिक करा | दैनंदिन जीवनात सकाळच्या वेळी तुमच्या कानावर पडणाऱ्या आवाजांचे वर्गीकरण करा यामध्ये ऐकावेसे वाटणारे आवाज व त्रासदायक वाटणारे आवाज यांची यादी करून लेखन करा.<br>विशिष्ट आवाज व त्या संदर्भातील तुमच्या आठवणी याबाबत लेखन व चर्चा करा.<br>नाट्यछटा बनवून सादरीकरण करा. |
| दुसरा आठवडा | 08-01-08<br>08-01-14<br>08-01-17 | 10. लिओ नार्दो दा व्हिंची | येथे क्लिक करा | दिलेला पाठ वाचून लिओ नार्दो दा व्हिंची यांच्या मध्ये असलेल्या गुणांची यादी तयार करा.<br>पाच भारतीय चित्रकारांची आंतरजालावरून माहिती मिळवा आणि लिहा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | माझी आवडती कला या विषयावर चर्चा करून मत नोंदवा. |
| तिसरा आठवडा | 08-01-01<br>08-01-03<br>08-01-05<br>08-01-08 | 5. स्वामी विवेकानंदांची भारत यात्रा | येथे क्लिक करा | स्वामी विवेकानंदांच्या राष्ट्रभक्ती विचारा बाबत आपले स्वमत लिहा.<br>" काम करत असताना एखादे संकट आले की माणूस जागरूक राहून काम करतो ' याविषयी तुमचा अनुभव कथन करा. |
| चौथा आठवडा | 08-01-01<br>08-01-03<br>08-01-05<br>08-01-08 | 5. स्वामी विवेकानंदांची भारत यात्रा | येथे क्लिक करा | स्वामी विवेकानंदांच्या राष्ट्रभक्ती विचारा बाबत आपले स्वमत लिहा.<br>" काम करत असताना एखादे संकट आले की माणूस जागरूक राहून काम करतो ' याविषयी तुमचा अनुभव कथन करा. |

**माहे – ऑगस्ट २०२०** **विषय – मराठी**

| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| पहिला आठवडा | 08.01.01<br>08.01.03<br>08.01.15<br>08.01.16 | 3. लाखांच्या … कोटींच्या गप्पा | येथे क्लिक करा | 1गाडीतील प्रवाशांच्या कृती बाबत लेखन करा.<br>2.विनोदी साहित्य लिहिणाऱ्या साहित्यिकांची नावेआंतरजालाच्या साहाय्याने मिळवा व त्यांची यादी तयार करा.<br>3.विद्यार्थी पाठाचे लेखन करून पाठाचा आशय स्वतःच्या शब्दातसांगतील.<br>4.विद्यार्थी पाठातील कठीण शब्द शोधून त्याचे अर्थ शोधतील.<br>5.विद्यार्थी पाठाच्या आशयावर आपले मत लिखित स्वरुपात व्यक्त करतील. |
| दुसरा आठवडा | 08.01.10<br>08.01.12 | 4. नव्या युगाचे गाणे ( कविता) | येथे क्लिक करा | 1.विद्यार्थी कविता लक्षपूर्वकऐकतील.<br>2.विद्यार्थी कवितेमधील शब्दांचा अर्थ शोधून त्याचे लेखन करतील.<br>3.विद्यार्थी कवितेचा आशय समजून घेण्याचा प्रयत्न करतील.<br>4.विद्यार्थी  पावसाचा मानवी जीवनावर होणारा परिणाम याबाबत स्वतःच्या शब्दात  आपले विचार लेखन करतील . |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | 5.विद्यार्थी कवितेवर आधारित प्रश्न निर्माण करून त्याचे उत्तर लेखन करतील. |
| तिसरा आठवडा | 08.01.02<br>08.01.09<br>08.01.10<br>08.01.12 | 6. असा रंगारी श्रावण ( कविता) | येथे क्लिक करा | 1.विद्यार्थी कवितेचे समजपूर्वक वाचन करतील.<br>2.विद्यार्थी कविते मधील यमक जुळणारे शब्द शोधतील.<br>3.विद्यार्थी निसर्गातील विलोभनीय बदलाबाबत आपले मत स्वतःच्या शब्दात लेखन करतील.<br>4.विद्यार्थी स्वतःच्या कल्पनेने कविता तयार करून प्रकट वाचन करतील. |
| चौथा आठवडा | 08.01.01<br>08.01.03<br>08.01.04<br>08.01.05 | 7. अण्णा भाऊंची भेट | येथे क्लिक करा | 1.अण्णाभाऊ साठे यांचे व्यक्तिमत्व विशेषयाबाबत अधिक माहिती मिळवून, चर्चा करून, लेखन करा.<br>2. अण्णाभाऊ साठे यांची स्मशानातील सोनं ही कथा मिळवा व या कथेचे वाचन करा.<br>3.विद्यार्थी पाठाचे लेखन करून पाठाचा आशय स्वतःच्या शब्दात सांगतील.<br>4.विद्यार्थी पाठातील कठीण शब्द शोधून त्याचे अर्थ शोधतील.<br>5.विद्यार्थी पाठाच्या आशयावर आपले मत लिखित स्वरूपात व्यक्त करतील.. |

**माहे – जून २०२०** **विषय – गणित**

| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| पहिला आठवडा | 08.71.01<br>08.71.02 | परिमेय व अपरिमेय संख्या | दीक्षाॲपचावापर (QR code),चार्ट पेपर,कागद,आलेख कागद,डॉट पेपर,लांब मोजपट्टी,काडी /लाकडाची पट्टी,Geogebraसॉफ्टवेअर tools चावापर ,<br>येथे क्लिक करा<br>येथे क्लिक करा<br>येथे क्लिक करा | 1.पुस्तकातील QR code मदतीने घरातील मोठ्या व्यक्तीच्या मार्गदर्शनात व निर्दशनात विद्यार्थी दीक्षा AAPच्या साहाय्याने संख्यांचे प्रकार,परिमेय व अपरिमेय संख्या,परिमेय संख्यातील क्रमसंबंध,तुलना,दंशांश रुप,अपरिमेय संख्या,संख्यारेषेवर अपरिमेय संख्या दाखविणे इत्यादी समजून घ्या.<br>2.घरी चार्ट पेपरवर संख्यांचे प्रकार लिहून प्रकारानुसार संख्या समूह लिहा. किंवा संख्या समूहानुसार कागदाच्या पट्ट्या तयार करून संख्यांचे प्रकार समजून घ्या. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा | 3.मोजपट्टी किंवा घरी उपलब्ध लाकडाची पट्टी किंवा काडीचावापर करुन संख्यारेषा तयार करा,समान अंतरावर चार्टकागदाचा वापर करुन पूर्णांक संख्या तयार करुन दाखवा ,यानुसार संख्यातील क्रमसंबंध,तुलना,करा. कंपास पेटीच्या सहाय्याने आलेख कागदाचा किंवा डॉट पेपर चा वापर करुन अपरिमेय संख्या दाखवा. |
| दुसरा आठवडा | 08.71.01<br>08.71.02 | परिमेय व अपरिमेय संख्या | | सराव करा.पुढील परिमेय संख्या संख्यारेषेवर दाखवा. 1/2, 2/3, 5/8 इ. यासाठी आपण वेगवेगळ्या तीन दो-या व चिमटे घेवून या तीनही परिमेय संख्या दोरीवर दाखवू. ते पुढीलप्रमाणे दिसेल.<br><br>•वरीलप्रमाणेच संख्यारेषेवर या परिमेय संख्या फलकावर संख्यारेषा काढून मांडून दाखवतील. त्यानंतर फलकावर एक खुली संख्यारेषा काढतील. त्यात आरंभबिंदू 0 दाखवून डावीकडे ऋण पूर्णांक व उजवीकडे धन पूर्णांक संख्या लिहितील. या संख्यारेषेवर एक धन परिमेय व एक ऋण परिमेय संख्या दाखवतील. त्यासाठी चर्चेतून परिमेय संख्या कोणत्या दोन पूर्णांक संख्यांच्या दरम्यान येते याचे निरीक्षण करा. त्यानंतरच परिमेय संख्या संख्यारेषेवर दाखवा. पुढीलप्रमाणे 5/3 व -5/3 या परिमेय दाखवा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | <br><br>•वरील प्रमाणे संख्यारेषेवर सराव करा. येथे एक बाब लक्षात घेतील की, दिलेल्या परिमेय संख्येचा जो छेद आहे तोच अंश असेल तर त्याची किंमत 1 येते. |

**माहे – जुलै २०२०** **विषय – गणित**

| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| पहिला आठवडा | 08.71.19 | समांतर रेषा व छेदिका | *दीक्षाॲपचावापर (QR code),ट्रेस पेपर ,कागद,आगपेटीच्या काड्या,किंवा इतर काड्या,*<br>*येथे क्लिक करा*<br>*येथे क्लिक करा*<br>*येथे क्लिक करा*<br>*येथे क्लिक करा*<br>*येथे क्लिक करा*<br>*येथे क्लिक करा* | <br><br>दीक्षा AAPच्या साहाय्याने दोन समांतर रेषांच्या छेदिकेमुळे तयार होणाया कोनाच्या जोड्याचे गणुधर्म पडताळून पहा.<br>जोडो स्ट्रॉद्वारे दोन समांतर रेषा तयार करून त्यांना एका छेदिकेने छेदण्याची प्रतिकृती विद्यार्थ्यांना करायला लावतील. ही प्रतिकृती पुढीलप्रमाणे दिसेल.<br>वरीलप्रमाणे ,को-या कागदावर दोन रेषा व यांची छेदिका घड्या घालून तयार करा.छेदिकेमुळे तयार होणारे संगतकोन, विरुद्ध कोन, आंतर कोन वेगवेगळ्या रंगाने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | दर्शवा व कोनमापकाच्या सहाय्याने सर्व कोन  मोजा व तुमच्या वहीत नोंदवा.व पडताळा घ्या.<br>दोन रेषा समांतर असतील प्रत्येक रेषा उर्वरित दोन रेषची छेदिका होऊ शकते. हे पडताळून पहा.<br> ग्रीड कागदावर दोन समांतर रेषा व त्यांची छेदिका काढा. संगत कोनाया जोड्या व व्युत्क्रम कोनाच्या जोड्या  एकरूप  आहेत. हे कोनमापकाने पडताळून पहा.<br>आंतरकोनाया मापाची बेरीज हे 180°असते हे कोनमापकाया सहायाने पडताळून पाहतील.<br>दोनपेक्षा जास्त समांतर रेषा व त्यांची छेदिका काढून सांगत कोण व्युत्क्रम कोण व आंतरकोनांच्या जोड्यांचे गुणधर्म पडताळून पहा.<br>समांतर रेषा व  छेदिका दाखिवण्यासाठी आलेख कागद/डॉट पेपर,/ग्रीड  पेपर चा वापर करा.<br>ट्रेस पेपरचा वापर करून आंतरकोन,संगत कोन व व्युत्क्रम कोन यांचे गुणधर्म पडताळून पहा.<br>परिसरात  आढळणारे कोन, रेषीय जोडीतील कोन, समांतर रेषा व छेदिका यामुळे तयार होणारे कोन व कोनाच्या जोड्या  यांचे निरीक्षण व तुमच्या शिक्षकांशी चर्चा करा. |
| दुसरा आठवडा | 08.71.19 | समांतर रेषा व छेदिका | येथे क्लिक करा<br><br>**येथे क्लिक करा** | समांतर रेषा व  छेदिका दाखिवण्यासाठी आलेख कागद/डॉट पेपर,/ग्रीड  पेपर चा वापर करा.<br>ट्रेस पेपरचा वापर करून आंतरकोन,संगत कोन व व्युत्क्रम |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | कोन यांचे गुणधर्म पडताळून पहा. |
| तिसरा आठवडा | 08.71.19 | समांतर रेषा व छेदिका | पाठ्यपुस्तक | पाठ्यपुस्तकातील  सराव संच २.१ तुमच्या वहीत सोडवा. |
| चौथा आठवडा | 08.71.23 | दिलेल्या रेषेला समांतर रेषा काढणे. | पाठ्यपुस्तक | पाठ्यपुस्तकात दिल्या प्रमाणे तिन्ही रीत वापरून तुमच्या वहीत एक समांतर रेषा काढून त्या रेषेला दुसरी समांतर रेषा काढा.<br>सराव संच २.३ सोडवा. |

**माहे – ऑगस्ट २०२०** **विषय – गणित**

| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| पहिला आठवडा | 08.71.03,<br>08.71.04 | घातांक व घनमूळ | मागील इयत्तेचे पाठ्यपुस्तक<br>येथे क्लिक करा<br>येथे क्लिक करा<br>येथे क्लिक करा | दीक्षा  AAP च्या साहाय्याने घन व घनमूळ म्हणजे काय?<br>1.एकाच संख्येचा त्याच संख्येशी केलेला पुन्हा पुन्हा गुणाकार म्हणजे त्या संख्येचा घात करणे ही संकल्पना जोडो ब्लॉक्सच्या मदतीने/किवा घरातील वस्तू यांच्या सहाय्याने गुणाकार संबोधाचा आधार घेऊन समजून घ्या.<br><br>2.उदा. 2 चा वर्ग म्हणजेच$2 \times 2 = 2^2$होय यासाठी 2 जोडो ब्लॉक्सचा/वस्तू (दोन पेन)एकगटकरून 1 वेळा 2 म्हणजे$1 \times 2 = 2 = 2^1$हा सहसंबंध स्पष्ट करतील.<br><br>3.आता 2 चा गट 2 वेळा घेणे म्हणजेच |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | $2 \times 2 = 2^2 = 4$असा सहसंबंध लक्ष्यात घ्या.. 4.यामध्ये 2 हा पाया व त्यावर लिहिलेला 2 म्हणजे त्याचा घात होय हे सांगतील. **अशा पाया व घात असलेल्या संख्येला घातांकित संख्या असे म्हणतात.** **येथे**$2^2 = 4$ ही एक घातांकित संख्या आहे. तसेच मागील इयत्तेमध्ये अभ्यासलेले घातांक चे विविध नियम अभ्यासा व वहीत नोंदवा. |
| दुसरा आठवडा | 08.71.03, 04 | घातांक व घनमूळ | दीक्षाॲपचावापर (QR code),चार्टपेपर,घन आकाराच्या वस्तू,CUBOID<br><br>येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा | पूर्णांक संख्येंचे घन,पूर्ण घन संख्या,घनमूळ व पूर्ण घन संख्येचे घनमूळ व वर्गमूळ काढणे पुढील VIDEO च्या माध्यमातून अभ्यास व तुमच्या वहीत नोंदी करा. |
| तिसरा आठवडा | 08.71.03, 04 | घातांक व घनमूळ घातांक परिमेय संख्या असलेल्या संख्यांचा अर्थ | | संख्येचा घातांक ½,1/3,1/4 ...1/n या रूपातील परिमेय संख्या असेल तर ...<br>• आता एखाद्या संख्येचे वर्गमूळ व घनमूळ हे चिन्ह वापरून लिहिण्याची पद्धत खालील प्रमाणे अभ्यास.उदा. 4 चेवर्गमूळ 2 हे $\sqrt{4} = 2$असे लिहितात<br>उदा. 8 चेघनमूळ 2 हीसंख्या$\sqrt[3]{8} = 2$ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | 64 चे घनमूळ 4 हीसंख्या$\sqrt[3]{64} = 4$असे लिहितात.<br>• एखाद्या संख्येचे वर्गमूळ लिहिण्याची अजून एक पद्धत आहे. जसे 9 चे वर्गमूळ 3 हे आपण $\sqrt[2]{9 = 3}$ आपण $9^{\frac{1}{2}} = 3$ असे ही लिहू शकतो. येथे घाताच्या ठिकाणी ½ असा अपूर्णांक दिसतो. घाताच्या ठिकाणी ½ म्हणजेच वर्गमूळ हे लक्षात घ्या. तर घाताच्या ठिकाणी 1/3 म्हणजे घनमूळ, ¼ म्हणजे चौथे मूळ, 1/5 म्हणजे 5 वे मूळ हा आकृतीबंध लक्षात ठेवा. |
| चौथा आठवडा | | संख्येचा घातांक m/n या रूपातील परिमेय संख्या असेल 08.71.03,04त | | संख्येचा घातांक m/n या रूपातील परिमेय संख्या असेल तर<br>**जसे½ला आपण वर्गमूळ असे म्हणतो तर घातात 3/2 आला तर काय म्हणावे?**<br>• लक्षात घ्या- की घातात 3/2 आला तर याचा अर्थ होतो अगोदर दिलेल्या संख्येचे वर्गमूळ काढून नंतर आलेल्या वर्ग मूळाचा 3 रा घात (घन) घेतात. उदा. $4^{\frac{3}{2}}$ काढताना अगोदर 4 चे वर्गमूळ काढावे (जेआहे 2) व नंतर आलेल्या वर्गमूळाचा घन करावा. ( येथे वर्गमूळ आहे 2 म्हणून 2 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | चा घन होतो 8)<br>म्हणून $4^{\frac{3}{2}}$ याची किंमत येते 8.<br>• याचे वाचन 4 च्या वर्गमूळाचा तिसरा घात असे ही करतात. यावरुन $9^{\frac{3}{2}}$ याचे वाचन कसे कराल? ( 9 च्या वर्गमूळाचा तिसरा घात)<br>• $4^{\frac{3}{2}}$ याचेच वाचन अजून एका प्रकारे करता येईल- जसे की, 4 च्या तिस-या घाताचे दुसरे मूळ (वर्गमूळ)असे ही वाचन करता येते. म्हणून या संख्येची किंमत देखील होईल- 4 चातिसराघात = 64 आणि 64 चे वर्गमूळ = 8<br>• थोडक्यात $4^{\frac{3}{2}}$ अशा संख्यांचे वाचन दोन प्रकारे करता येते.<br>1) 4 च्या वर्गमूळाचा (दुस-यामुळाचा) तिसरा घात<br>2) 4 च्या तिस-या घाताचे दुसरे मूळ<br>अशा प्रकारे वर्गमूळ, घनमूळ, चौथे मूळ इ. विविध मूळे असलेल्या संख्यांचे त्यांच्या घातांसहित वाचन करण्याचा सराव करा. त्यानंतर पाठयपुस्तकातील उदाहरणांचा सरावसंच ३.१,३.२ सोडवा. |

**माहे – जून २०२०** **विषय – इंग्रजी**

| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| तिसरा आठवडा | The learner….. <br>• communicates appropriately. <br>• participates in spoken English activities. <br><br>learns new words, expressions and enriches vocabulary. | **Unit one** <br>1.1 Be the Best <br><br>Introductory Activities. <br><br>Chit Chat Activity. | Download DIKSHA App and 8th Std. English Textbook <br>येथे क्लिक करा | **Use DIKSHA App &Scan the QR Code given on page no. 5 or click on the given link.** <br>• Listen to the song and sing it with actions. <br><br>Tell your experience about the first day of school to your mother. |
| चौथा आठवडा | The learner….. <br>recites/ sings some songs and poems with action. <br><br>understands the main idea of poem. <br><br>participates in language games | **Unit one** <br>1.1 Be the Best (poem) <br>English Workshop | येथे क्लिक करा | **Use DIKSHA App & Scan the QR Code given on page no. 5 or click on the given link.** <br>• Watch the videos. <br>• Find out the rhyming words from the poem. <br><br>Write an appreciation of the poem with the help of given points on page no. 5 |

माहे – जुलै विषय – इंग्रजी

| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| पहिला आठवडा | The learner…. .<br>communicates appropriately.<br>enjoys story.<br>participates with joy | **Unit one**<br>1.2 Androcles, and the Lion<br>Chit Chat Activity<br>**Unit one**<br>1.2 Androcles, and the Lion<br>Chit Chat Activity | येथे क्लिक करा | Use DIKSHA App & Scan the QR Code given on page no. 11 or click on the given link.<br>• Watch the videos.<br>Tell the names of five stories about bravery to your friends. |
| दुसरा आठवडा | The learner …..<br>learns new words, expressions and enriches vocabulary through reading.<br>understands the story .<br>understands | **Unit one**<br>1.2 Androcles, and the Lion (Story) | येथे क्लिक करा | Use DIKSHA App & Scan the QR Code given on page no. 11 or click on the given link.<br>• Watch the videos.<br>• Find out the opposite words from the lesson.<br>Narrate the story to your parents or friends in your own words. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | moral of the story.<br><br>narrates a story. | | | |
| तिसरा आठवडा | The learner …..<br>enjoys the story.<br><br>completes the given task. | <u>Unit one</u><br>1.2 Androcles, and the Lion English workshop<br><br>Language Study | येथे क्लिक करा | **Use DIKSHA App & Scan the QR Code given on page no. 11 or click on the given link.**<br>• Watch the videos.<br><br>Find out an auxiliary verb from the lesson and use it in your own sentences. |
| चौथा आठवडा | The learner …..<br><br>enjoys chit-chat activity.<br><br>communicates properly.<br><br>enriches vocabulary.<br><br>writes meaningful phrases. | <u>Unit One</u><br>1.3 Trees are the Kindest Things I Know<br>Chit-chat activity.<br><br>Poem | येथे क्लिक करा | **Use DIKSHA App & Scan the QR Code given on page no. 11 or click on the given link.**<br>• Watch the videos.<br>• Write down four phrases which describe anything that is beautiful in the Nature.<br>• Tell the importance of tree plantation to your parents or friends.<br><br>Recite the poem with rhythm and action. |

माहे – ऑगस्ट विषय – इंग्रजी

| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| पहिला आठवडा | The learner …..<br>understands the main idea of the poem.<br>understands the benefits of trees.<br>enjoys the poem with interest.<br>communicates properly.<br>completes the given task . | **Unit One**<br>1.3 Trees are the Kindest Things I Know<br>English Workshop<br>Language Study | येथे क्लिक करा | Use DIKSHA App & Scan the QR Code given on page no. 11 or click on the given link.<br>• Watch the videos.<br>• Find out the describing words from the poem.<br>• Find out the rhyming words from the poem.<br>• Tell the importance of trees to your neighbour.<br>• Write down your views about Halloween festival.<br>Complete the table of degree given on page no. 16. |
| दुसरा आठवडा | The learner …..<br>enjoys Chit-chat activity.<br>participates in language study actively.<br>participates in writing task. | **Unit one**<br>1.4 Miss Slippery<br>Chit-chat Activity | येथे क्लिक करा | Use DIKSHA App & Scan the QR Code given on page no. 11 or click on the given link.<br>• Watch the videos.<br>Write in your own words, about your favorite personality. Give reasons. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| तिसरा आठवडा | The learner..... enjoys the story<br><br>learns new words, expressions and enriches vocabulary.<br><br>gets engaged in conversation.<br><br>narrates a story/ incident.<br><br>evaluates whether something is true or false, relevant, etc. | **Unit one** 1.4 Miss Slippery Lesson<br><br>Part - 1 | येथे क्लिक करा | **Use DIKSHA App & Scan the QR Code given on page no. 11 or click on the given link.**<br>• Watch the videos.<br>• Read the lesson carefully and describe 'Miss Slippery' to your friends.<br><br>Find out the meanings of new words from the lesson with the help of a dictionary. |
| चौथा आठवडा | The learner..... enjoys the story learns new words, expressions and enriches vocabulary. gets engaged in conversation. narrates a story/ incident. evaluates whether something is true or false, relevant, etc | **Unit One** 1.4 Miss Slippery Lesson<br><br>Part -2 | येथे क्लिक करा | **Use DIKSHA App & Scan the QR Code given on page no. 11 or click on the given link.**<br>• Watch the videos.<br>• Tell this story to your friends or parents.<br>• What message do you get from the story?<br><br>How did Sayali overcome such a critical condition? |

माहे – जून                                        विषय – विज्ञान

| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| तिसरा आठवडा | 08.72.01 , 08.72.02 आणि 08.72.09 | सजीव सृष्टी व सूक्ष्मजीवांचे वर्गीकरण | येथे क्लिक करा | या पाठात आलेल्या विविध सुक्ष्मजीवांची चित्रे इंटरनेट वरून मिळावा व वहीत संग्रह करा. |
| | 08.72.09 | | येथे क्लिक करा | १.वर्गीकरणाचा पदानुक्रम स्पष्ट करा.<br>२.मासा, ऊंट, सिंह आणि याक या विविध प्रदेशातील प्राण्यांमधील साम्य व भेद वहीत लिहा. |
| | 08.72.01 आणि 08.72.02 | | येथे क्लिक करा | कोणत्याही पाच वनस्पती व प्राण्यांची शास्त्रीय नावे इंटरनेटचा वापर करून शोधा व ती वहीत लिहून काढा. |
| | 08.72.01 | | येथे क्लिक करा | कार्ल लिनीअस, हेकेल, चॅटन, कोपलँड यांची वर्गीकरण पद्धत तक्त्याच्या स्वरूपात मांडून चार्ट तयार करा. |
| | 08.72.09 | | येथे क्लिक करा | व्हिटाकर यांच्या पंचसृष्टी वर्गीकरण पद्धतीचा तक्ता चार्ट तयार करा / |
| चौथा आठवडा | 08.72.01 आणि 08.72.02 | सजीव सृष्टी व सूक्ष्मजीवांचे वर्गीकरण | येथे क्लिक करा | पुढील कृती करून पहा:- एक पावाचा किंवा भाकरीचा तुकडा थोडासा ओलसर करा व एक डबीत ठेवून तिला झाकण लावा. दोन - तीन दिवसानंतर डबी उघडून पहा. आपली निरीक्षणे वहीत नोंदवा. |
| | 08.72.09 | | येथे क्लिक करा | व्हिटाकर यांच्या वर्गीकरण पद्धतीचे गुण-दोष वहीत नोंदवा. |
| | 08.72.01 आणि 08.72.02 | | येथे क्लिक करा | जीवाणूंचे प्रकार, पॅरामेशिअम, बॅक्टेरिओफेज, बुरशी यांची अचूक व नामनिर्देशित आकृती वहीत काढा. |
| | 08.72.01 आणि 08.72.02 | | येथे क्लिक करा | विविध जीवाणू , विषाणू व त्यामुळें होणारे रोग यांचा माहिती तक्ता बनवा. |

माहे – जुलै                                        विषय – विज्ञान

| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| पहिला आठवडा | 08.72.07 | सजीव सृष्टी व सूक्ष्मजीवांचे वर्गीकरण | येथे क्लिक करा | १. आरोग्य आणि रोग या संकल्पना स्पष्ट करा. २. कोणत्याही एका आजाराची माहिती देणारे आणि जनजागृती करणारे भित्तीपत्रक / चार्ट तयार करा. |
| | 08.72.01 | | येथे क्लिक करा | आपल्या जीवनामध्ये नियमितपणे व्यायाम करणे आणि संतुलित आहार घेणे याचे महत्व याबाबत पालकांबरोबर चर्चा करा. |
| | 08.72.01 | | येथे क्लिक करा | १. रोग म्हणजे काय ते सांगून रोगांचे विविध प्रकार उदाहरणासहित स्पष्ट करा. २. हिवताप, प्लेग, कुष्ठरोग या रोगांची माहिती मिळवा व कारक, संक्रमण माध्यम, लक्षणे, उपाय यांचा तक्ता / चार्ट करा. |
| | 08.72.07 | | येथे क्लिक करा | १. संसर्गजन्य रोग म्हणजे काय ते सांगून कांजिण्या रोगाची लक्षणे स्पष्ट करा. २.WHO जागतिक आरोग्य संघटनेची माहिती इंटरनेटच्या मदतीने शोधा व ती वहीत लिहून ठेवा. |
| | 08.72.02 | | येथे क्लिक करा | १.कोरोना या सद्यस्थितीत पसरलेल्या रोगाबाबत अधिक माहिती मिळवा. २.घरातील मोठ्या व्यक्तींसोबत फुलदाणी, कूलर, टायर, प्लास्टिक बाटली इ. मध्ये साचलेले पाणी स्वच्छ करून कोरडा दिन पाळा. ३.डेंग्यु या रोगाची कारणे,लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपाय स्पष्ट करा. |
| | 08.72.02 | | येथे क्लिक करा | १.स्वाईन फ्लू या रोगाची लक्षणे ,कारणे आणि प्रतिबंधात्मक उपाय स्पष्ट करा. २.राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था (NIV), पुणे या संस्थेची |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | माहिती इंटरनेटवरून शोधा. |
| दुसरा आठवडा | 08.72.02 | सजीव सृष्टी व सूक्ष्मजीवांचे वर्गीकरण | येथे क्लिक करा | एड्स चे प्रतिबंधात्मक उपाय लिहा. |
| | 08.72.01 | | येथे क्लिक करा | १.प्राण्यामार्फत होणारा रोगप्रसार टाळण्यासाठी उपाययोजना सुचवा. २.प्राण्यांच्या राहण्याच्या जागा, पिंजरे हे स्वयंपाकघर व जेवणाच्या ठिकाणी का असू नये याची माहिती मिळवा व वहीत लिहून ठेवा. ३.रेबिज या रोगाची लक्षणे स्पष्ट करा. |
| | 08.72.02 | | येथे क्लिक करा | १. कर्करोग होण्याची कारणे आणि त्याचे शरीरावर होणारे परिणाम स्पष्ट करा. २.अतिप्रमाणात जंकफूड उदा. वडापाव, पिझ्झा इ. खाण्याचे दुष्परिणामविषयी कुटुंबातील सदस्य यांच्याशी चर्चा करा व माहिती वहीत लिहा. |
| | 08.72.02 | | येथे क्लिक करा | इंटरनेटवर मधुमेहाची माहिती देणारे विविध व्हिडीओ पहा. |
| | 08.72.01 | | येथे क्लिक करा | १. औषधांचा गैरवापर केल्याने मानवी शरीरावर होणारे परिणाम स्पष्ट करा. २.तुमच्या घरी असणाऱ्या औषधांची नावे व त्यातील घटक लिहा व त्यांची यादी करा. |
| | 08.72.02 | | येथे क्लिक करा<br>येथे क्लिक करा | हृदयविकार होण्याची  कारणे,लक्षणे आणि त्यावर उपाययोजना याबाबत माहिती लिहा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| तिसरा आठवडा | 08.72.01 | बल व दाब | येथे क्लिक करा | १.बल ही संकल्पना स्पष्ट करा.<br>२.कागदाचे तुकडे आणि कंगव्याची कृती करून असंपर्क बलाचे अध्ययन करा आणि निरीक्षणे वहीत नोंदवा. |
| | 08.72.01 | | येथे क्लिक करा | चुंबक आणि लोखंडी वस्तू घेऊन संपर्क बलाचे अध्ययन करा आणि निरीक्षणे वहीत नोंदवा. |
| | 08.72.04 | | येथे क्लिक करा | 5 रुपयांचे किंवा 10 रुपयांचे नाणे व कागदाच्या साहाय्याने जडत्वाचे प्रयोग स्वत: करून पहा आणि निरीक्षणे वहीत नोंदवा. |
| | 08.72.03 | | येथे क्लिक करा | १. दाब ही संकल्पना स्पष्ट करा.<br>२.मुंड चाकू आणि धारदार चाकूच्या साहाय्याने एखादे फळ कापून पहा आणि निरीक्षणे वहीत नोंदवा. |
| | 08.72.03 | | येथे क्लिक करा | १.द्रवाचा दाब ही संकल्पना स्पष्ट करा.२.पाण्याची रिकामी बाटली आणि फुग्याची कृती करून पहा आणि निरीक्षणे वहीत नोंदवा. |
| | 08.72.03 | | येथे क्लिक करा | फुग्याच्या साहाय्याने कृती करून पहा |
| | 08.72.13 | | येथे क्लिक करा | प्लावकबल म्हणजे काय? कृती द्वारे अध्ययन करा |
| | 08.72.03 | | येथे क्लिक करा | स्वाध्याय मधील उदाहरणे सोडवा |
| चौथा आठवडा | 08.72.13 | धाराविद्युतआणि चुंबकत्व | येथे क्लिक करा | T V च्या रिमोट मध्ये विद्युत घटांची जोडणीचे निरीक्षण करा |

माहे – ऑगस्ट                                        विषय – विज्ञान

| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| पहिला आठवडा | | अणूचे अंतरंग | येथे क्लिक करा | पाठयपुस्तकातील तक्ता क्र 5.1 पूर्ण करून वहीत लिहा |
| | 08.72.09 | | येथे क्लिक करा | डाल्टनचा अणूसिद्धांत व थॉमसन प्लम पुडिंग अणु प्रारूप यामधील फरक लिहा |
| | 08.72.09 | | येथे क्लिक करा | *थॉमसनव रुदरफोर्ड यांच्या अणुप्रारूपा मध्ये धनप्रभाराचे वितरण व इलेक्ट्रॉनच्यास्थिती संबंधात काय वेगळेपणा आहे, ते लिहा ?* |
| | 08.72.09 | | येथे क्लिक करा | डाल्टनचा अणुसिद्धांत, थॉमसन प्लम पुडिंग अणु प्रारुप, रुदरफोर्डचे केंद्रकीय अणुप्रारूप, बोरचे स्थायी कक्षा अणुप्रारुप यांची नामनिर्देशित आकृती कडून तक्ता / चार्टतयार करा |
| | 08.72.02 | | येथे क्लिक करा | प्रोटॉन, न्यूट्रॉन, इलेक्ट्रॉनच्या गुणधर्मातील फरक स्पष्ट करणारा तक्ता / सारणी तयारकरा. |
| | 08.72.02 | | येथे क्लिक करा | पाठयपुस्तकातील पान नं .32 वरील जरा डोके चालवा या कृतीतील प्रश्नांची उत्तरे लिहा. |
| दुसरा आठवडा | 08.72.02 व 08.72.11 | अणूचे अंतरंग | येथे क्लिक करा | कार्बन) 6), ऑक्सीजन) 8), निऑन ) 10), सोडिअम) 11), क्लोरीन) 17) या मूलद्रव्यांच्या अणूंची इलेक्ट्रॉन संरूपण रेखाटा. |
| | 08.72.02 व 08.72.11 | | येथे क्लिक करा | मूलद्रव्ये अणुअंक 1 ते 18 यांचे इलेक्ट्रॉन संरूपण लिहा वत्यावरून त्यांची संयुजा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | ठरवा. |
| | 08.72.02 | | येथे क्लिक करा | पाठयपुस्तकातील पान नं .36 वरील जरा डोके चालवा या कृतीतील प्रश्नांची उत्तरे लिहा. |
| | 08.72.02 व 08.72.11 | | येथे क्लिक करा | जड पाणी म्हणजे काय ती माहिती इंटरनेट वरुन मिळवा व ती वहीत लिहा. |
| | 08.72.02 | | येथे क्लिक करा<br>येथे क्लिक करा | या लिंकवर क्लिक करून हा व्हिडीओ अवश्य पहा. अणूभट्टी बाबत इंटरनेट वरुन अधिक माहिती मिळवा. |
| तिसरा आठवडा | 08.72.03 व 08.72.11 | द्रव्याचे संघटन | येथे क्लिक करा | पाठयपुस्तकातील पान नं 39 मोहरीच्या दाण्यांची हालचाल ही कृती करून पहा. |
| | 08.72.02 | | येथे क्लिक करा | 1) मूलद्रव्य व संयुग यातील फरक लिहा .<br>2) दूध हे मिश्रण आहे हे सकारण लिहा. |
| | 08.72.03 व 08.72.11 | | येथे क्लिक करा | लोखंडी खिळा, तांब्याची तार घ्या. ही वस्तू सँडपेपरने घासून मिळालेला ताजा पृष्ठभाग पहा. तुमचे निरीक्षण नोंदवा, यावरून धातूंचा कोणता गुणधर्म लक्षात येते ते लिहा. |
| | 08.72.03 | | येथे क्लिक करा | पाठपुस्तकातील पान नं 42 वरील संयुगांचे प्रकार ही कृती करून पहा. |
| | 08.72.02 | | येथे क्लिक करा | 1) मूलद्रव्य व संयुग यातील फरक लिहा.<br>2) दूध हे मिश्रण आहे हे सकारण लिहा |
| चौथा आठवडा | 08.72.01<br>08.72.01 | द्रव्याचे संघटन | येथे क्लिक करा | मिश्रणांची वैशिष्ट्ये उदाहरणांसह लिहा. |
| | 08.72.04 | | येथे क्लिक करा | द्रावणाचे विविध प्रकार उदाहरणांसह तक्ता चार्ट करा / |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 08.72.06 | | येथे क्लिक करा | पुढेदिलेल्या रेणुसूत्रांवरून त्या संयुगातील घटक मूलद्रव्यांची नावे, संज्ञा लिहा वत्यांच्या संयुजा लिहा .HBr, Na2S, BaCl2, CCl4 |
| | 08.72.02 | | येथे क्लिक करा | पाठयपुस्तकातील पान नं .46 वरील जरा डोके चालवा या कृतीतील प्रश्नांची उत्तरे लिहा. |

**माहे – जून २०२०** **विषय – सामाजिक शास्त्र (इतिहास व ना.शा.)**

| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| तिसरा आठवडा<br><br>व<br><br>चौथा आठवडा | 08.73H.01<br>इतिहासाची विविध साधने ओळखतात आणि त्यांचा या काळातील इतिहासाच्या पुनर्लेखनासाठी उपयोग स्पष्ट करतात. | १.इतिहासाची साधने | (इतिहासाची साधने-प्रस्तावना)<br>येथे क्लिक करा<br><br>(इमारती व वास्तू भाग-2)<br>येथे क्लिक करा<br><br>(लिखितसाधने)<br>येथे क्लिक करा<br><br>(नकाशेवआराखडे)<br>येथे क्लिक करा<br><br>(मौखिकसाधने)<br>येथे क्लिक करा<br><br>(ध्वनीमुद्रित-रेकॉर्ड्स्)<br>येथे क्लिक करा | पाठ्यपुस्तकातील पाठ क्रमांक१.इतिहासाची साधने हा पाठ वाचण्यास सांगणे.<br>इतिहासाची साधने पाठाची प्रस्तावना पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>इमारती व वास्तू भाग 2 विषयी माहिती पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>लिखित साधने विषयी माहिती पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>नकाशे व आराखडे विषयी माहिती पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>मौखिक साधने विषयी माहिती पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>ध्वनीमुद्रित-रेकॉर्ड स्विषयी माहिती पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br><br>दृक, श्राव्य आणि दृक-श्राव्य साधने विषयी माहिती पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | (दृक, श्राव्यआणिदृक-श्राव्यसाधने)<br>येथे क्लिक करा | क्लिक करण्यास सांगणे.<br>कृती व उपक्रम<br>सध्याच्या काळातील वर्तमानपत्रांची यादी करा.<br>तुम्हला माहिती असलेल्या दृक, श्राव्य आणि दृक-श्राव्य साधनांची यादी तयार करा.<br>किल्ले ,राजवाडे व ऐतिहासिक मंदिरे यांची यादी करा.<br>पाठातील भौतिक, लिखित व मौखिक साधनांचा तक्ता तयार करा. |
| चौथा आठवडा | | | | |

**माहे – जुलै** **विषय – सामाजिक शास्त्र (इतिहास व ना.शा.)**

| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| पहिला आठवडा<br>व<br><br>दुसरा आठवडा | 08.73H.03<br>ब्रिटिश ईस्ट इंडिया ही कंपनी सर्वाधिक बलशाली सत्ता कशी बनली हे स्पष्ट 1 करतात. | २.युरोप आणि भारत | (प्रस्तावना)<br>येथे क्लिक करा<br><br>(प्रबोधन युग भाग२)<br>येथे क्लिक करा<br><br>(धर्मसुधारणा चळवळ)<br>येथे क्लिक करा<br><br>(युरोपातील वैचारिक क्रांती)<br>येथे क्लिक करा<br><br>अमेरिकन स्वातंत्र्य | पाठ्यपुस्तकातील पाठ क्रमांक २.युरोप आणि भारत या पाठाचे वाचन करण्यास सांगणे.<br>युरोप आणि भारत पाठाची प्रस्तावना पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>प्रबोधन युग भाग२ बद्दल माहिती पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>धर्मसुधारणा चळवळ विषयी माहिती पाहण्यासाठी दिलेल्या लिंक ला क्लिक करण्यास सांगणे.<br>युरोपातील वैचारिक क्रांती विषयी माहिती पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध या विषयी माहिती |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | युद्ध)<br>येथे क्लिक करा<br><br>(फ्रेंच राज्यक्रांती)<br>येथे क्लिक करा<br><br>(भांडवलशाहीचा उदय)<br>येथे क्लिक करा<br><br>(साम्राज्यवाद)<br>येथे क्लिक करा<br><br>(बंगालमध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या सत्तेचा पाया)<br>येथे क्लिक करा<br><br>(इंग्रज-म्हैसूर संघर्ष)<br>येथे क्लिक करा<br><br>(युरोप आणि भारत)<br>येथे क्लिक करा | पाहण्यासाठी दिलेल्या लिंक ला क्लिक करण्यास सांगणे.<br>फ्रेंच राज्यक्रांतीबद्दल माहिती पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>भांडवलशाहीबद्दल माहिती पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>साम्राज्यवादबद्दल माहिती पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>बंगालमध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या सत्तेचा पायाबद्दल माहिती पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br><br>इंग्रज-म्हैसूर संघर्ष पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>युरोप आणि भरायया पाठातील प्रश्नांचा सराव करण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे. |
| तिसरा आठवडा<br><br>व<br><br>चौथा आठवडा | | १.संसदीय शासन पद्धतीची ओळख | (प्रस्तावना)<br>येथे क्लिक करा<br><br>(संसदीय शासन पद्धती भाग१)<br>येथे क्लिक करा<br><br>(संसदीय शासनपद्धती भाग२)<br>येथे क्लिक करा | नागरिकशास्त्र मधील पाठ क्रमांक१.संसदीय शासन पद्धतीची ओळख या पाठाचे वाचन करण्यास सांगणे.<br>पाठाची प्रस्तावना पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>संसदीय शासन पद्धती भाग१बद्दल माहिती पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>संसदीय शासन पद्धती भाग २ बद्दल माहिती पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | (अध्यक्षीय शासनपद्धती)<br>येथे क्लिक करा | क्लिक करण्यास सांगणे.<br><br>अध्यक्षीय शासन पद्धती बद्दल माहिती पाहण्यासाठी दिलेल्या लिंक ला क्लिक करण्यास सांगणे.<br>कृती व उपक्रम<br>जगातील लोकशाही, हुकूमशाही असलेल्या राष्ट्रांची यादी करा.<br>संसदीय व अध्यक्षीय शासन पद्धती असणाऱ्या राष्ट्रांची यादी करा. |

माहे – ऑगस्ट     विषय – सामाजिक शास्त्र (इतिहास व ना.शा.)

| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| पहिला आठवडा<br>व<br>दुसरा आठवडा | 08.73H.04<br>विविध प्रदेशातील ब्रिटिश कृषी धोरणां मधील फरक स्पष्ट करुन सांगतात.उदा.,निळी चा उठाव<br>08.73H.08<br>ब्रिटिश सत्तेच्या काळात प्राचीन,नागरी व व्यापारी केंद्रे हस्तव्यवसाया वर आधारित उद्योगलयाला जाऊन नवीन नागरी व्यापारी केंद्रे आणि उद्योगधंदे विकसित कसे झाले या गोष्टीचे विश्लेषण करतात | ३.ब्रिटिशसत्तेचे परिणाम | (प्रस्तावना)<br>येथे क्लिक करा<br>(तैनाती फौजा)<br>येथे क्लिक करा<br>(छत्रपती प्रताप सिंह)<br>येथे क्लिक करा<br>(ब्रिटिशसत्तेचे भारतावरील परिणाम: दुहेरी राज्यव्यवस्था)<br>येथे क्लिक करा<br>(मुलकी नोकरशाही)<br>येथे क्लिक करा<br>इंग्रजांची आर्थिक धोरणे)<br>येथे क्लिक करा<br>(नव्या जमीन महसूल व्यवस्थेचे परिणाम)<br>येथे क्लिक करा<br>(वाहतूक व | पाठ्यपुस्तकातील पाठ क्रमांक३.ब्रिटिशसत्तेचे परिणाम हा पाठ वाचण्यास सांगणे.<br>पाठाची प्रस्तावना पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>तैनाती फौजबद्दक माहिती पाहण्यासाठी दिलेल्या लिंक ला क्लिक करण्यास सांगणे.<br>छत्रपती प्रताप सिंह यांच्या बद्दल माहिती पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>ब्रिटिश सत्तेचे भारतावरील परिणाम:दुहेरी राज्य व्यवस्था पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>मुलकी नोकरशाही या विषयी माहिती पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>इंग्रजांची आर्थिक धोरणे पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>नव्या जमीन महसूल व्यवस्थेचे परिणाम पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>वाहतूक वदळणवळण व्यवस्थेत सुधारणा पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>सामाजिक व सांस्कृतिक परिणाम पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>कृती |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | दळणवळण व्यवस्थेत सुधारणा)<br>येथे क्लिक करा<br><br>(सामाजिक व सांस्कृतिक परिणाम)<br>येथे क्लिक करा | तुमच्या काळातील वाहतुक वदळणवळण साधनांची यादी करा.<br>आजच्या काळातील शिक्षण पद्धती विषयी माहिती लिहा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| तिसरा आठवडा<br><br>व<br><br>चौथा आठवडा | 08.73H.05<br>एकोणिसाव्या शतकातील आदिवासी समाजाच्या रचना आणि त्यांचे पर्यावरणाशी असलेले नाते यांचे वर्णन करतात.<br>08.73H.06<br>आदिवासी समाजाच्या संदर्भातील ब्रिटिशांच्या प्रशासकीय धोरणांचे स्पष्टीकरण देतात.<br>08.73H.07<br>१८५७च्या स्वातंत्र्यलढ्याचा उगम,स्वरूप आणि विस्तार तसेच त्या पासून घेतलेला बोध यांचे स्पष्टीकरण देतात. | ४.१८५७चास्वा तंत्र्यलढा | (प्रस्तावना)<br>येथे क्लिक करा<br><br>(१८५७पूर्वी चे लढे)<br>येथे क्लिक करा<br><br>(पाईकांचा उठाव)<br>येथे क्लिक करा<br><br>(राजकीय कारणे)<br>येथे क्लिक करा<br><br>(तात्कालिक कारण)<br>येथे क्लिक करा<br><br>(लढ्याची व्याप्ती)<br>येथे क्लिक करा<br><br>(बिमोड)<br>येथे क्लिक करा<br><br>(लढा अयशस्वी होण्या चीकारणे भाग१)<br>येथे क्लिक करा<br>(लढा अयशस्वी होण्याची कारणे भाग२)<br>येथे क्लिक करा<br>(स्वातंत्र्य लढ्याचे परिणाम भाग१)<br>येथे क्लिक करा<br>(स्वातंत्र्य लढ्याचे | पाठ्यपुस्तकातील पाठ क्रमांक४.१८५७चा स्वातंत्रलढाया पाठाचे वाचन करण्यास सांगणे.<br>या पाठाची प्रस्तावना पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>१८५७पूर्वीचे लढे या विषयी माहिती पाहण्यासाठी दिलेल्या लिंक ला क्लिक करण्यास सांगणे.<br>पाईकांचा उठाव पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्या ससांगणे.<br>१८५७च्या उठावाची राजकीय कारणे पाहण्यासाठी दिलेल्या लिंक ला क्लिक करण्यास सांगणे.<br>१८५७च्या उठावाची तात्कालिक कारणे पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>१८५७च्या उठावाची व्याप्ती पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>१८५७च्या उठावा चा बिमोड पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>१८५७च्या उठाव अयशस्वी होण्याची कारणे भाग१ पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br><br>१८५७च्या उठाव अयशस्वी होण्याची कारणे भाग२ पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br><br>१८५७च्या स्वातंत्र्यलढ्याचे परिणाम भाग१ पाहण्यासाठी दिलेल्या लिंक ला क्लिक करण्यास सांगणे.<br><br>१८५७च्या स्वातंत्र्यलढ्याचे परिणाम भाग २ पाहण्यासाठी दिलेल्या लिंकला क्लिक करण्यास सांगणे.<br>कृती व उपक्रम |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | परिणाम भाग२)<br>येथे क्लिक करा | पान क्रमांक १८ व तील १८५७ चा स्वातंत्र्य लढा या नकाशात इंग्रजांच्या ताब्यातील प्रदेश,लढ्यातील महत्वपूर्ण ठिकाणे पहा/दाखवा.<br>१८५७च्या स्वातंत्र्यलढ्यातील सहभागी महिलांची नावे लिहा.<br>१८५७च्या स्वातंत्र्यलढ्यातील सहभागी सैनिकांची/नेत्यांची नावे लिहा.<br>१८५७चा लढा यशस्वी होण्यासाठी तुम्ही काय केले असते ते लिहा. |

**माहे – जून २०२०** **विषय – सामाजिक शास्त्र-भूगोल**

| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| तिसरा आठवडा | इयत्ता ७ वी – पाठ्यपुस्तकातील अध्ययन निष्पत्ती क्र ६ | पूर्व तयारी | येथे क्लिक करा | दीक्षा APP मध्ये दिल्या प्रमाणे कृती करा. अडचण आल्यास शिक्षकांसोबत दूरध्वनी द्वारे संपर्क साधा. |
| चौथा आठवडा | इयत्ता ७ वी – पाठ्यपुस्तकातील अध्ययन निष्पत्ती क्र ०६ | पूर्व तयारी | प्रत्यक्ष अनुभव<br><br>महाराष्ट्राचा नकाशा | इयत्ता ८वी च्या पाठ्यपुस्तकातील पान क्र ४९ वरील आकृती ७.५ चे निरीक्षण करून खालील प्रश्नांची उत्तरे शोधा.<br>प्रश्न १ – महाराष्ट्रातील १००० पेक्षा अधिक लोकसंख्येची घनता असलेल्या जिल्ह्याची नावे लिहा.<br>प्रश्न २ – महाराष्ट्रातील सर्वात कमी लोकसंख्येची घनता असलेल्या जिल्ह्यांची नावे लिहा.<br>प्रश्न ३ – एका व्यक्तीने महाराष्ट्रातील अशा जिल्ह्यात नवीन कारखाना उभारला आहे की, त्या जिल्ह्याला कर्नाटक राज्याची सीमा लागुल आहे, त्या जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता १०० ते २५० दरम्यान आहे व तो जिल्हा अरबी समुद्रालगत आहे तर त्या व्यक्तीने कोणत्या जिल्ह्यात कारखाना उभारला ते ओळखा. |

माहे – जुलै　　　　　　　　　　विषय – सामाजिक शास्त्र-भूगोल

| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| पहिला आठवडा | पाठ्यपुस्तकातील अध्ययन निष्पत्ती क्र ०१, ०२ | पाठ १. स्थानिक वेळ व प्रमाण वेळ | दीक्षा APP<br><br>येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा | दीक्षा APP मध्ये दिल्या प्रमाणे कृती करा. अडचण आल्यास शिक्षकांसोबत दूरध्वनी द्वारे संपर्क साधा. |
| दुसरा आठवडा | पाठ्यपुस्तकातील अध्ययन निष्पत्ती क्र ०१, ०२ | पाठ १. स्थानिक वेळ व प्रमाण वेळ | प्रत्यक्ष अनुभव | संपलेली लेखणी / पेन यास लाकडी फळीवर किंवा जाड कागदावर उभे चिकटवा / स्थिर करा. त्यानंतर ते साधन अंगणात अशा प्रकारे उभे ठेवा की त्यावर सतत प्रकाश राहील व त्याची सावली दिसेल. सूर्योदय ते सूर्यास्त दर अर्धा तासाने सावलीच्या स्थितीवर खुणा करा व तेव्हाची घड्याळी वेळ लिहा. विशेषत: जेव्हा पेन / लेखणी यांची सावली दुपारी दिसणार नाही (सावली पूर्णत: पायामध्ये असेल) तेव्हा स्थानिक वेळे प्रमाणे दुपारचे १२:०० वाजले |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | आहे व ही स्थानिक वेळ आहे हे समजून घ्या. |
| तिसरा आठवडा | पाठ्यपुस्तकातील अध्ययन निष्पत्ती क्र ०१, ०२ | पाठ १. स्थानिक वेळ व प्रमाण वेळ | प्रत्यक्ष अनुभव<br><br>स्वाध्याय | संपलेली लेखणी / पेन व लाकडी फळीवर किंवा जाड कागदावर यांच्या सहाय्याने बनविलेल्या सावलीच्या घडाळ्याच्या उपयोग करून 'स्थानिक वेळ' व 'प्रमाण वेळ' यातील तफावत शोधा. पाठ्यपुस्तकातील पान क्र. ०५ वरील 'प्रमाण वेळ' या बाबतचा पाठ्यांश वाचून व पान क्र. ०६ वरील आकृती १.४ चे निरीक्षण करून 'प्रमाण वेळेची गरज' याबाबत १० ओळीत माहिती लिहा.<br><br>पाठ्यपुस्तकातील पान क्र. ०४ वरील आकृती १.३ चे निरीक्षण करून 'जागतिक प्रमाणवेळ' व ' रेखावृत्त व वेळ यांचा सह सबंध' समजून घ्या. त्या आधारावर १० ओळीत माहिती लिहा. अडचण आल्यास शिक्षकांसोबत दूरध्वनी द्वारे संपर्क साधा. |
| चौथा आठवडा | पाठ्यपुस्तकातील अध्ययन निष्पत्ती क्र ०३ | पाठ २ पृथ्वीचे अंतरंग | दीक्षा APP<br><br>येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा<br><br>येथे क्लिक करा | दीक्षा APP मध्ये दिल्या प्रमाणे कृती करा. अडचण आल्यास शिक्षकांसोबत दूरध्वनी द्वारे संपर्क साधा. |

**माहे – ऑगस्ट** **विषय – सामाजिक शास्त्र-भूगोल**

| आठवडा | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | पाठाचे नाव | अध्ययन स्त्रोत | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|---|
| पहिला आठवडा | पाठ्यपुस्तकातील अध्ययन निष्पत्ती क्र ०३ | पाठ २ पृथ्वीचे अंतरंग | प्रत्यक्ष अनुभव | पाठ्यपुस्तकातील पान क्र. १० वरील आकृती २.१ चे निरीक्षण करा. तसेच ती आकृती वहीमध्ये काढा |
| दुसरा आठवडा | पाठ्यपुस्तकातील अध्ययन निष्पत्ती क्र ०३ | पाठ २ सूर्य, चंद्र व पृथ्वी | प्रत्यक्ष अनुभव<br><br>स्वाध्याय | कृती क्ले किंवा गव्हाचे पीठ (कणिक) – भूकवच दर्शविण्यासाठी, दाळीचे पीठ (बेसन) - प्रावरण दर्शविण्यासाठी व लाल मातीचा गोळा – अंतर्गाभा दर्शविण्यासाठी वापरून पाठ्यपुस्तकातील पान क्र. ११ वरील पृथ्वीचे अंतरंग समजून घेण्यासाठी दिलेली कृती करा. निरीक्षणे वहीमध्ये नोंदवा.<br><br>पुस्तकातील पान क्र. १५ वरील स्वाध्याय सोडवा. अडचण आल्यास शिक्षकांसोबत दूरध्वनी द्वारे संपर्क साधा. |
| तिसरा आठवडा | पाठ्यपुस्तकातील अध्ययन निष्पत्ती क्र ०३, ०४ व ०५ | पाठ ३ आद्रता व ढग | दीक्षा APP<br><br>येथे क्लिक करा<br>येथे क्लिक करा<br>येथे क्लिक करा<br>येथे क्लिक करा<br>येथे क्लिक करा<br>येथे क्लिक करा<br>येथे क्लिक करा<br>येथे क्लिक करा | दीक्षा APP मध्ये दिल्या प्रमाणे कृती करा. अडचण आल्यास शिक्षकांसोबत दूरध्वनी द्वारे संपर्क साधा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | येथे क्लिक करा | |
| चौथा आठवडा | पाठ्यपुस्तकातील अध्ययन निष्पत्ती क्र ०३, ०४ व ०५ | पाठ ३ आद्रता व ढग | प्रत्यक्ष अनुभव | पाठ्यपुस्तक पान क्र १९ वरील 'करून पहा' तील आकुती ३.५ मध्ये सुचविलेली कृती घरातील वडीलधारी मंडळी यांचे उपस्थितीत करा. त्या अनुभवाच्या आधारावर निरीक्षणे वहीत नोंदवा. |

# धन्यवाद !